Lecture on *Swarajyache Armor* by Shri Raghujiraje Angre.

लोकमत

# छत्रपती शिवाजी महाराजांचे आरमार सुरक्षेची शाश्वती देणारे

## केशवराव भोईटे व्याख्यानमालेत रघुजीराजे आंग्रे यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** दोन पोर्तुगीजांना हाताशी घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी व्यापारासाठी बोट बांधणीला सुरुवात केली. पोर्तुगीज आज ना उद्या दगा देतील म्हणून राज्यातील तज्ञ सुतारांनी ते ज्ञान आत्मसात केले. तीरकामठे, भाले, दोन अडीच फुटांच्या तलवारीच्या जोरावर महाराजांनी अनेक लढाया जिंकल्या. महाराजांचे आरमार इतके सक्षम होते की, रयतेच्या रक्षणासोबतच परदेशी व्यापाऱ्यांना सुरक्षेची शाश्वती देणारे होते. आरमारामुळेच स्वराज्य आणि स्वराज्याच्या बाजारपेठा समृद्ध झाल्या, असे प्रतिपादन श्री. छत्रपती



शिवाजीराजे रायगड मेमोरीयल मंडळ, पुणे येथील अध्यक्ष तथा अभ्यासक रघुजीराजे आंग्रे यांनी केले.

जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे नूतन मराठा महाविद्यालय आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केशवराव भोईटे व्याख्यानमालेच्या अंतर्गत शुक्रवारी दि. १६ रोजी व्याख्यान संध्याकाळी भय्यासाहेब गंधे सभागृहात आयोजित करण्यात आले होते. यावेळी रघुजीराजे आंग्रे हे बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, शिवाजीराव केशवराव भोईटे, प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत केशवराव भोईटे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. व्याख्यानात पुढे बोलतांना आंग्रे म्हणाले, की शिवाजी महाराज यांचे नेतृत्वगुण वाखाणण्याजोगे होते. त्यांनी स्वराज्य उभारताना सर्व घटकांचा विचार केला होता. त्यामुळे खऱ्या अर्थाने लोकप्रिय स्वराज्याची निर्मिती छत्रपती शिवाजी महाराजांनी केली होती, असे आंग्रे यांनी सांगितले. आभार पल्लवी शिंपी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नूतन मराठा महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

Hello Jalgaon
Page No. 2 Feb 17, 2024
Powered by: erelego.com